# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
# (सचिवालय)

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 128 (अ) अंतर्गत
**{मालमत्ता कर विभाग}** मालमत्ता करामध्ये समाविष्ट असलेले कर कलम 99 (कराचे दर निश्चित करणे) या अंतर्गत पुढील आर्थिक वर्षात महानगरपालिकेव्दारे कर ज्या दरानी बसविण्यात येतील तसेच ते पुढील आर्थिक वर्षात ज्या दरानी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा नागपूर महानगरपालिकेने स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेउन करावयाची आहे. नागपूर महानगरपालिकेने सभागृहाचे ठराव क्र. 70 दि. 04/03/2015 अन्वये आर्थिक वर्ष 2015-2016 करीता निश्चित केलेले मालमत्ता कर दर व वृक्ष कर करीता ठराव क्र. 64 दि. 20/07/2017 नुसार निश्चित केलेले उक्त मालमत्ता कर दर हे वेळोवेळी स्थायी समिती व म.न.पा. सभागृहानी निर्णय घेवून आर्थिक वर्ष 2015-2016, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-2020, 2020-21, 2021-22 व 2022-23 करीता सुध्दा निश्चित करण्यात आले होते.

नागपूर महानगरपालिकाद्वारा ज्या दरानी नागपूर महानगरपालिका सिमेतील इमारत व जमिनी करीता सध्यास्थितीत मालमत्ता कर आकारते व महाराष्ट्र राज्यातील इतर महानगरपालिका जसे की पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वसई विरार शहर महानगरपालिका, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका द्वारा ज्या दरानी इमारत व जमिनी करीता मालमत्ता कर आकारते त्या दराच्या अनुषंगाने तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे. (तुलनात्मक तक्ता धारीकेच्या उजव्या बाजुस पताका क्र. 'अ' अन्वये प्रदर्शीत)

उक्त बाबी विचारात घेउन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम 99 च्या तरतुदी अन्वये स्थायी समितीनी निर्णय घेउन नागपूर महानगरपालिका सभागृहापुढे आर्थिक वर्ष सन 2023-2024 करीता दर महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेउन फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापुर्वी निश्चित करणे आवश्यक आहे. सन 2023-2024 हया आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता करांतर्गत आकारावयाचे विविध कर व त्यांचे दर निश्चित करण्याबाबतचा विषय बाबत निर्णय घेणेचे प्रश्न विचारात घेणे.

| अ. क्र. | कराचा प्रकार | वार्षिक भाडे मुल्य | सन 2022-2023 करीता आकारण्यात येणारे प्रचलित कराचे दर | सन 2023-2024 करीता प्रस्तावित कराचे दर |
|---|---|---|---|---|
| 1 | सामान्य कर | 1 ते 2000 | 14 टक्के | 18 टक्के |
| | | 2001 ते 5000 | 18 टक्के | 22 टक्के |
| | | 5001 ते 20000 | 22 टक्के | 26 टक्के |
| | | 20001 ते 50000 | 26 टक्के | 30 टक्के |
| | | 50001 व त्याचे वर | 30 टक्के | 34 टक्के |
| 2 | साफसफाई किंवा मलप्रवाह कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 12 टक्के | 12 टक्के |
| 3 | मलप्रवाह लाभ कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का | 1 टक्का |
| 4 | पाणी पट्टी कर | 1 ते 2000 | 10 टक्के | 10 टक्के |
| | | 2001 ते 5000 | 12 टक्के | 12 टक्के |
| | | 5001 व त्याचे वर | 15 टक्के | 15 टक्के |
| 5 | पाणी पुरवठा लाभ कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का | 2 टक्के |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 6 | अग्निशमन कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का | 2 टक्के |
| 7 | दिवाबत्ती कर | लागु नाही | ---- | ---- |
| 8 | रस्ते (पथ) कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का | 2 टक्के |
| 9 | म.न.पा. शिक्षण कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का | 2 टक्के |
| 10 | वृक्ष कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का | 2 टक्के |

**या व्यतिरिक्त शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरेन्ट, मंगल कार्यालये, लॉन्स व हॉस्पीटल्स या मालमत्तांवर खालील दराने वार्षीक विशेष सफाई कर आकारण्यात येत आहे.**

| अ. क्र. | कराचा प्रकार | वार्षिक भाडे मुल्य | सन 2022-2023 करीता आकारण्यात येणारे प्रचलित कराचे दर | सन 2023-2024 करीता प्रस्तावित कराचे दर |
|---|---|---|---|---|
| 1 | विशेष सफाई कर | 50000 पावेतो | 7 टक्के | 7 टक्के |
| | | 50001 व त्यापेक्षा जास्त | 10 टक्के | 10 टक्के |

**राज्य शासनाचे कर**

| अ. क्र. | कराचा प्रकार | वार्षिक भाडे मुल्य | सन 2022-2023 करीता आकारण्यात येणारे प्रचलित कराचे दर | सन 2023-2024 करीता प्रस्तावित कराचे दर |
|---|---|---|---|---|
| 1 | शिक्षण कर ( निवासी) | 1 ते 150 | 2 टक्के | 2 टक्के |
| | | 151 ते 300 | 3 टक्के | 3 टक्के |
| | | 301 ते 3000 | 4 टक्के | 4 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 5 टक्के | 5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 6 टक्के | 6 टक्के |
| 2 | शिक्षण कर ( अनिवासी) | 1 ते 150 | 4 टक्के | 4 टक्के |
| | | 151 ते 300 | 6 टक्के | 6 टक्के |
| | | 301 ते 3000 | 8 टक्के | 8 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 10 टक्के | 10 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 12 टक्के | 12 टक्के |
| 3 | रोजगार हमी कर (फक्त अनिवासी) | 1 ते 150 | 1 टक्का | 1 टक्का |
| | | 151 ते 300 | 1.5 टक्के | 1.5 टक्के |
| | | 301 ते 3000 | 2 टक्के | 2 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 2.5 टक्के | 2.5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 3 टक्के | 3 टक्के |
| 4 | मोठया निवासी इमारतीवरील कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | 10 टक्के | 10 टक्के |

टीप –

1) स्थायी समिती कडून प्रस्तावित शिफारस प्राप्त झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 99 च्या तरतूदीनूसार 20 फेब्रुवारी 2023 च्या पूर्वी म.न.पा. सभागृहाची मान्यता घेणे आवश्यक आहे.
2) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 99 (कराचे दर निश्चित करणे) नुसार पुढील आर्थिक वर्षात महानगरपालिकेव्दारे मालमत्ता करांतर्गत असणारे कर व ते ज्या दराने बसविण्यात येतील ज्या

मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा याबाबत महानगरपालिकेने स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेऊन फेब्रुवारी महिन्याच्या 20 तारखेला किंवा त्यापुर्वी निश्चित करावयाचे आहेत.

3) आर्थिक वर्ष 2023-2024 करीता प्रस्तावित दर वाढीमुळे (सामान्य कराच्या कमाल दर व किमान दरात 4% वाढ, पाणी पुरवठा लाभ कर दरात 1% वाढ, अग्निशमन कर दरात 1% वाढ, रस्ते कर दरात 1% वाढ, म.न.पा. शिक्षण कर दरात 1% वाढ, वृक्ष कर दरात 1% वाढ) मालमत्ता कराच्या उत्पन्नात रु.3211.74 लक्ष नी भर पडणार आहे.

4) या प्रस्तावामध्ये राज्य शासनाची शिक्षण कर, रोजगार हमी कर व मोठया निवासी इमारतीवरील करांच्या दरामध्ये सुद्धा कुठलाही बदल शासनातर्फे करण्यात आलेला नाही.

5) सविस्तर टिपणी नस्तीत उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 299/मनपा/प्रशासक** **दिनांक :-01/ 03 /2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त (महसूल), मालमत्ता कर विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 128 (अ) अंतर्गत मालमत्ता करामध्ये समाविष्ट असलेले कर कलम 99 (कराचे दर निश्चित करणे) या अंतर्गत पुढील आर्थिक वर्षात महानगरपालिकेव्दारे कर ज्या दरानी बसविण्यात येतील तसेच ते पुढील आर्थिक वर्षात ज्या दरानी व ज्या मर्यादेपर्यंत बसविण्यात येतील ते दर व ती मर्यादा नागपूर महानगरपालिकेने स्थायी समितीचे प्रस्ताव विचारात घेउन करावयाची आहे. नागपूर महानगरपालिकेने सभागृहाचे ठराव क्र. 70 दि. 04/03/2015 अन्वये आर्थिक वर्ष 2015-2016 करीता निश्चित केलेले मालमत्ता कर दर व वृक्ष कर करीता ठराव क्र. 64 दि. 20/07/2017 नुसार निश्चित केलेले उक्त मालमत्ता कर दर हे वेळोवेळी स्थायी समिती व म.न.पा. सभागृहानी निर्णय घेवून आर्थिक वर्ष 2015-2016, 2016-17, 2017-18, 2018-19, 2019-2020, 2020-21, 2021-22 व 2022-23 करीता सुध्दा निश्चित करण्यात आले होते.

नागपूर महानगरपालिकाद्वारा ज्या दरानी नागपूर महानगरपालिका सिमेतील इमारत व जमिनी करीता सध्यास्थितीत मालमत्ता कर आकारते व महाराष्ट्र राज्यातील इतर महानगरपालिका जसे की पिंपरी चिंचवड महानगरपालिका, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, वसई विरार शहर महानगरपालिका, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका द्वारा ज्या दरानी इमारत व जमिनी करीता मालमत्ता कर आकारते त्या दराच्या अनुषंगाने तुलनात्मक तक्ता सोबत जोडलेला आहे. (तुलनात्मक तक्ता धारीकेच्या उजव्या बाजुस पताका क्र. ‘अ‘ अन्वये प्रदर्शीत)

उक्त बाबी विचारात घेउन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम कलम 99 च्या तरतुदी अन्वये स्थायी समितीनी निर्णय घेउन नागपूर महानगरपालिका सभागृहापुढे आर्थिक वर्ष सन 2023-2024 करीता दर महानगरपालिकेने स्थायी समितीचा प्रस्ताव विचारात घेउन फेब्रुवारी महिन्याच्या वीस तारखेला किंवा त्यापुर्वी निश्चित करणे आवश्यक आहे. हया अनुषंगाने सन 2023-2024 हया आर्थिक वर्षामध्ये मालमत्ता करांतर्गत आकारावयाचे विविध कर व त्यांचे दर निश्चित करण्याबाबतचा विषय बाबत निर्णय घेण्याचा प्रश्न विचारात घेउन असे निर्णय घेण्यात आले की, नागपूर महानगरपालिका सभागृहाचे ठराव क्र. 70 दि. 04/03/2015 अन्वये सन 2015-2016 हया आर्थिक वर्षापासुन मालमत्ता कर आकारणी करीता करयोग्य मुल्य आधारीत पद्धत सुरु झालेली असुन हयाकरीता नागपूर महानगरपालिका सिमाक्षेत्रातील सर्व मालमत्तांचे G.I.S. Based सर्वेक्षण होणे आवश्यक असुन कोविड-19 च्या प्रादुर्भावामुळे जवळपास दोन वर्ष G.I.S. based data संकलित करण्यात आले नसल्यामुळे सदर काम हे सन 2021-2022 पर्यंत पुर्ण झालेले असून जवळपास सर्व मालमत्तांच्या मालमत्ता करात वाढ झालेली आहे. त्यामुळे आर्थिक वर्ष 2023-2024 करीता विभागाने प्रस्तावित केलेले वाढीव दर तुर्तास लागू करणे योग्य ठरणार नाही. महाराष्ट्र महानगरपालिका

अधिनियम 1949 चे कलम 99 च्या तरतूदी अन्वये असलेल्या अधिकारांतर्गत आर्थिक वर्ष 2022-2023 करीता अस्तित्तवात असलेले मालमत्ता करांतर्गत आकारावयाचे विविध कर व त्यांचे दरात कोणतीही वाढ किंवा घट न करता पुढील आर्थिक वर्ष 2023-2024 करीता कायम ठेवण्यात येते.

| अ. क्र. | कराचा प्रकार | आर्थिक वर्ष 2023-2024 करीता बसावावयाचे दर | |
|---|---|---|---|
| | | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर |
| 1 | सामान्य कर | 1 ते 2000 | 14 टक्के |
| | | 2001 ते 5000 | 18 टक्के |
| | | 5001 ते 20000 | 22 टक्के |
| | | 20001 ते 50000 | 26 टक्के |
| | | 50001 व त्याचे वर | 30 टक्के |
| 2 | साफसफाई किंवा मलप्रवाह कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 12 टक्के |
| 3 | मलप्रवाह लाभ कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 4 | पाणी पट्टी कर | 1 ते 2000 | 10 टक्के |
| | | 2001 ते 5000 | 12 टक्के |
| | | 5001 व त्याचे वर | 15 टक्के |
| 5 | पाणी पुरवठा लाभ कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 6 | अग्निशमन कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 7 | दिवाबत्ती कर | लागु नाही | ---- |
| 8 | रस्ते (पथ) कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 9 | म.न.पा. शिक्षण कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |
| 10 | वृक्ष कर | सर्व वार्षिक भाडे मुल्यावर | 1 टक्का |

**या व्यतिरिक्त शहरातील हॉटेल्स, रेस्टॉरेन्ट, मंगल कार्यालये, लॉन्स व हॉस्पीटल्स या मालमत्तांवर खालील दराने वार्षीक विशेष सफाई कर आकारण्यात येत आहे.**

| अ. क्र. | कराचा प्रकार | आर्थिक वर्ष 2023-2024 करीता बसावावयाचे दर | |
|---|---|---|---|
| | | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर |
| 11 | विशेष सफाई कर | 50000 पावेतो | 7 टक्के |
| | | 50001 व त्यापेक्षा जास्त | 10 टक्के |

**राज्य शासनाचे कर**

| अ. क्र. | कराचा प्रकार | आर्थिक वर्ष 2023-2024 करीता बसावावयाचे दर | |
|---|---|---|---|
| | | वार्षिक भाडे मुल्य | कराचा दर |
| 12 | शिक्षण कर ( निवासी) | 1 ते 150 | 2 टक्के |
| | | 151 ते 300 | 3 टक्के |
| | | 301 ते 3000 | 4 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 6 टक्के |
| 13 | शिक्षण कर ( अनिवासी) | 1 ते 150 | 4 टक्के |

| | | | |
|---|---|---|---|
| | | 151 ते 300 | 6 टक्के |
| | | 301 ते 3000 | 8 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 10 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 12 टक्के |
| 14 | रोजगार हमी कर (फक्त अनिवासी) | 1 ते 150 | 1 टक्का |
| | | 151 ते 300 | 1.5 टक्के |
| | | 301 ते 3000 | 2 टक्के |
| | | 3001 ते 6000 | 2.5 टक्के |
| | | 6001 व त्याचे वर | 3 टक्के |
| 15 | मोठया निवासी इमारतीवरील कर | सर्व वार्षीक भाडे मुल्यावर | 10 टक्के |

उपरोक्तप्रमाणे सन 2023-2024 हया आर्थिक वर्षाकरीता मालमत्ता कराच्या दरास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**